**महाराष्ट्र शासन**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१७ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

---

क्र:प्रविस्था-१२(२०२२)/परिपत्रक/नि.बदली-२०२२/का-१/ 282 दिनांक : -----/१/२०२२
28 JAN 2022

संदर्भ :-१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५, शासन अधिसूचना दि.२५.५.२००६
२) शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२१०/१०/१२, दि.३.६.२०११

**परिपत्रक**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील आणि अधिनस्त कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ मधील शासन अधिसूचना दिनांक २५.५.२००६ नुसार बदल्यांचे विनियमन विषयक अधिनियम २००५ अन्वये नियतकालिक बदल्यांची कार्यवाही एप्रिल / मे २०२२ मध्ये करावयाची आहे. तसेच संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयातील सूचनेनुसार अधिकारी/कर्मचारी यांची विनंती बदल्यांची प्रकरणे विचारात घ्यावयाची आहेत.

**शासन अधिसूचना दिनांक २५.५.२००६ नुसार बदल्यांचे विनियमन विषयक अधिनियम २००५ मधील प्रकरण दोन, कलम ३(१) अन्वये सेवेतील अधिकारी यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा असेल. याच अधिनियमातील कलम ४(१) नुसार अधिकाऱ्यांच्या नेमणुकीचा पदावधी पुर्ण केल्याखेरीज अधिकाऱ्यांची बदली करता येणार नाही. कलम ४(२) नुसार सक्षम प्राधिकारी प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात, त्या वर्षी एप्रिल व मे महिन्यात बदलीसाठी पात्र होतील अशी शासकीय अधिकाऱ्यांची यादी तयार करेल, असे निर्देश आहेत.**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील आणि अधिनस्त कार्यालयातील गट-अ आणि गट-ब मधील सर्व अधिकारी यांच्या नियतकालिक बदल्यांबाबत, सक्षम प्राधिकारी शासन आहे. त्यानुसार शासनास आवश्यक असलेली माहिती शासनास सादर करावयाची असल्याने, नियतकालिक बदल्यांच्या संदर्भात अधिनस्त कार्यालयातील विभाग प्रमुखांनी त्यांच्या स्तरावर तीन वर्षापेक्षा जास्त एकाच ठिकाणी कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांची माहिती दिनांक २८ फेब्रुवारी,२०२२ पूर्वी मुख्यालयास पाठवावी.

महासंचालनालयीनस्तरावर तसेच शासनस्तरावर करावयाच्या बदल्यांच्यादृष्टीने ज्यांना एका विभागामधून दुसऱ्या विभागामध्ये विनंती बदली करावयाची असल्यास, त्यांनी दि. २८ फेब्रुवारी,२०२२ पर्यंत, अर्ज विहित मार्गाने महासंचालनालयास सादर करावेत. या मुदतीनंतर वर्षभरात प्राप्त होणाऱ्या कोणत्याही स्वरुपाच्या विनंती बदली अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

महासंचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या विभागस्तरावरील कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग- ४ च्या कर्मचाऱ्यांच्या नियतकालिक बदल्या, संदर्भीय दि. २५.५.२००६ रोजीच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने आणि विभागांतर्गत विनंती बदली संदर्भीय दि.३.६.२०११ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्यास्तरावरुन बदल्यांबाबतची आवश्यक ती कार्यवाही करावी व तसा अहवाल महासंचालनालयास सादर करावा.

सदरचे परिपत्रक www.dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(गणेश रामदासी)
संचालक (माहिती)(प्रशासन)

प्रति,
सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी

कृ.मा.प.

**प्रत माहितीसाठी :-**

१. संचालक (माहिती/प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२. संचालक,(माहिती)(वृत्त व जनसंपर्क),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक,(माहिती), माहिती व जनसंपर्क, नागपूर-अमरावती विभाग,नागपूर
४. संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क, मराठवाडा विभाग-औरंगाबाद
५. उपसंचालक (माहिती/प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
६. उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई.
७. उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
८. उपसंचालक (प्रदर्शने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
९. उपसंचालक (माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र,नवी दिल्ली.
१०. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
११. उपसंचालक (माहिती),विभागीय माहिती कार्यालय,कोकण विभाग,नवी मुंबई/नाशिक/पुणे/कोल्हापूर/अमरावती/लातूर
१२. वरिष्ठ सहायक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी-गोवा.
१३. वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र शाखा) (प्रकाशने शाखा) (विभागीय संपर्क कक्ष) (महान्यूज)
१४. वरिष्ठ सहायक संचालक (आस्थापना) / (जाहिरात-प्रशासन)
१५. संशोधन अधिकारी, संशोधन शाखा
१६. सर्व जिल्हा माहिती अधिकारी (माहिती केंद्रासह)
१७. माहिती अधिकारी, उप माहिती कार्यालय, डहाणू/शिर्डी
१८. अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई
१९. सर्व कार्यासन प्रमुख, (तांत्रिक कक्षासह), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

**प्रत अग्रेषित :** १. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई-३२
२. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, का-३४-अ, मंत्रालय, मुंबई-३२.

# विवरणपत्र

विषय:- कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची माहिती उपलब्ध करण्याबाबत.
संदर्भ :- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५, शासन अधिसूचना दि.२५.५.२००६
२) शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२१०/१०/१२, दि.३.६.२०११

कार्यालयाचे नाव :

| संवर्ग | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व पदनाम | कार्यालयातील नियुक्तीचा दिनांक | कार्यालयातील सेवा कालावधी ---वर्षे---दिवस | जातीचा संवर्ग (जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत जोडावी) | शेरा (बदलीस पात्र/अपात्र त्याबाबतचे अभिप्राय) |
|---|---|---|---|---|---|
| वर्ग-१ अधिकारी | | | | | |
| वर्ग-२ अधिकारी | | | | | |
| वर्ग-३ कर्मचारी | | | | | |
| वर्ग-४कर्मचारी | | | | | |

कार्यालय प्रमुखाचे नाव, पदनाम व स्वाक्षरी

कार्यालयाचे नाव व पत्ता ------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

**टिप : उपरोक्त विवरणपत्रात वर्ग-१ ते वर्ग ४मधील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रत्येक रकान्यातील माहिती भरणे अनिवार्य आहे.**